मुद्रा यशोगाथा
नाव :- श्री. चंद्रशेखर करकरे, खालापूर, जि.रायगड
व्यवसाय :- टेलरिंगचा व्यवसाय

लाभार्थ्याची माहिती :-

१. देशातील बेरोजगार युवक युवती तसेच द्रारिदय रेषेखाली असलेल्यांना मुद्रा बँक योजनेचा खूप फायदा झाला आहे. ही योजना या वर्गातील घटकांना मृगजळ ठरली आहे. खालापूर तालुक्यात मुद्रा योजनेने नवे लघु उद्योजक घडविण्यासाठी चांगलेच कार्य केले आहे.

२. उदाहरण द्यायचे झाले तर पंजाब आणि सिंध बँकेच्या खालापूर शाखेतून जवळपास १२ लाभधारकांना या योजनेतून लाभ देण्यात आला आहे. तर आणखी बेरोजगार तरुण लघु उद्योग होण्यासाठी मुद्रा योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक आहेत. यातील काही प्रतिनिधीक यश कथा

३. खालापूरच्या दिपक टेलर्सचे मालक चंद्रशेखर करकरे यांना मुद्रा योजनाचा चांगलाच लाभ झाला आहे. ते सांगतात की, माझा कौटुंबिक उदरनिर्वाह शिलाई मशीनवर आहे. परंतु जुनी मशिन नेहमी बंद पडत असल्याने जुने कपडे रिपेरिंग करुन देणे, पाटलोण कमी जास्त करुन देणे ही कामे थांबल्याने माझ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती.

४. परंतु केंद्र सरकारच्या मुद्रा योजनेची माहिती मिळताच पंजाब आणि सिंध बँकेच्या शाखेत जाऊन ५० हजाराचे विनातारण मुद्रा कर्ज घेतले व नवीन शिलाई मशीन खरेदी करुन तसेच काही नवीन साहित्य खरेदी करुन नव्या दमाने व्यवसायाचा श्री गणेशा केला.

५. लवकरच या व्यवसायात जम बसवून साजगांव, खोपोली, खालापूर तालुक्यात हे कपडे शिलाई करण्याचे दुकान ग्राहकांचे पसंतीला उतरत आहे.

६. श्री करकरे याविषयी सांगतात, आपले सर्वांच्या शुभेच्छांमुळे माझ्या या नव्या शिलाई व्यवसायात बरकत आली आहे. या व्यवसायामुळे मी कौटुंबिक जबाबदा-या पार पाडण्यास मी सक्षम झालो व मला आशेचा किरण दिसू लागला आहे. कुटुंब प्रमुख म्हणून मी माझी जबाबदारी पूर्ण करीत असल्याचे समाधान वाटते.

---